


**About Us:** http://www.galaxyimrj.com/about-us/
**Archive:** http://www.galaxyimrj.com/archive/
**Contact Us:** http://www.galaxyimrj.com/contact-us/
**Editorial Board:** http://www.galaxyimrj.com/editorial-board/
**Submission:** http://www.galaxyimrj.com/submission/
**FAQ:** http://www.galaxyimrj.com/faq/

# ‘जेव्हा माणूस जागा होतो’ : वारल्यांच्या दु:खाची गाथा

**डॉ. उत्तरेश्वर ज्ञानोबा सुरवसे**
सहायक प्राध्यापक (मराठी विभाग),
वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर.

**सारांश :**

ठाणे जिल्ह्यातील डहाणू, तलासरी, पालघर या भागातील भुकेकंगाल आणि पिढ्यानपिढ्या गुलामीचे जीवन जगणाऱ्या आदिवासी वारली लोकांसाठी व्रतस्थपने कार्य गोदावरी परुळेकर यांनी केले. या आदिवासी वारली शेतकरी, शेतमजूर यांना संघटीत करून त्यांचे पिढ्यानपिढ्या अमानुषपणे शोषण करणाऱ्या जमीनदार, सावकार यांच्याविरुद्ध संघर्ष करण्यासाठी त्यांना जागे केले. त्यांना संघटीत करून ऐतिहासिक लढा उभा केला. त्या सर्व लढ्याची आणि गरीब व शोषित अशा सर्वहारा वारली शेतकऱ्यांच्या दु:खाची गाथा म्हणजे ‘जेव्हा माणूस जागा होतो’ हे पुस्तक होय. त्यांचे हे पुस्तक आत्मचरित्रपर आहे. ‘जेव्हा माणूस जागा होतो’ हे आत्मचरित्रपर पुस्तक मुंबईच्या नामांकित मौज प्रकाशन संस्थेने १९७० साली प्रकाशित केले. त्यानंतर या पुस्तकाला अखिल भारतीय स्तरावरील साहित्य क्षेत्रात महत्वाचे योगदान देणाऱ्या ‘साहित्य अकादमी’ या नामांकित संस्थेचा १९७२ साली पुरस्कार मिळाला. या पुरस्काराच्या सन्मानामुळे गोदावरी परुळेकर यांनी आदिवासी वारली लोकांसाठी जे सामाजिक कार्य केले त्याची ओळख खऱ्या अर्थाने सर्वत्र झाली. १९४२ ते १९५३ या कालखंडात सहकार्यांसोबत गोदावरी परुळेकरांनी आदिवासींमध्ये कार्य केले. केवळ त्याचेच चित्रण यातून वाचावयास मिळते. त्याचबरोबर गोदावरी परुळेकर या एका स्त्रीची विविध रूपे या आत्मचरित्राच्या पानापानातून नजरेस भरतात. ध्येयावर आढळ निष्ठा, माणुसकीच्या तळमळीतून चिडून उठलेल्या, साम्यवादी तत्त्वावर निष्ठा असलेल्या अशा गोदावरी परुळेकर यांच्या विविध रूपांचे दर्शन ‘जेव्हा माणूस जागा होतो’ मधून घडते.

**बीजसंज्ञा** : ‘आदिवासीएतर आत्मचरित्र’, ‘आदिवासी वारली जमात’, ‘लेखनशैली’, ‘सामाजिक कार्याचा दस्तऐवज’, ‘वारली जमातीचे अभावग्रस्त जीवन’

**प्रस्तावना :**

मराठी साहित्याला आदिवासी साहित्याने मोलाचे योगदान दिले आहे. या साहित्यातून ‘भिल्ल’, ‘कोरकू’, ‘परधान’, ‘गोंड’, ‘वारली’ इत्यादी आदिवासी जमातींचे चित्रण आलेले आहे. ‘कथा’, ‘कविता’, ‘कादंबरी’, ‘नाटक’,

'आत्मकथन' व 'वैचारिक लेखन' इत्यादी प्रकारांमधून आदिवासीमधील अनेक लेखकांनी आणि आदिवासीएतर लेखकांनी मराठीत आदिवासी साहित्य लिहिले आहे. आदिवासीतील नवशिक्षित लेखकांनी आदिवासी म्हणून आपण जे जगलो, जगताना आलेले अनुभव त्यांनी साहित्यातून मांडले. साहित्यातून त्यांनी मांडलेले आपले अनुभव मराठी साहित्याला अपरिचित होते.पूर्वी आदिवासींबद्दल पांढरेपेशी किंवा उच्च लोकांच्या मनोधारणा निराळ्या होत्या. आदिवासीविषयी त्यांच्या मनात अनेक पूर्वग्रह व चुकीच्या कल्पना होत्या. आदिवासी म्हणजे मागासलेले व रानटी या दृष्टीने त्यांच्याकडे पाहिले जाई. हा दृष्टिकोन आदिवासी साहित्याने बदलला. आदिवासी लेखकांनी जसे मराठीत आदिवासी साहित्य लिहिले तसेच आदिवासी नसलेल्या आदिवासीएतर लेखकांनीही आदिवासींचे जीवनचित्रण करणारे साहित्य मराठीत लिहिले आहे. त्याला आदिवासीएतरानी लिहिलेले आदिवासी साहित्य असे म्हणता येईल. आदिवासींमध्ये काम करत असताना आलेले अनुभव मांडावे किंवा आदिवासींना जाणून घ्यावे, आदिवासी हे सुद्धा माणूसच आहेत अशा धारणेतून हे आदिवासीएतरांचे लेखन झालेले आहे. मराठीत लेखन करणाऱ्या अशा आदिवासीएतर लेखकांची खूप मोठी परंपरा सांगता येईल. सिंधुताई सपकाळ - 'मी वनवासी, डॉ. प्रकाश आमटे - 'प्रकाशवाटा', सुधीर फडके - 'कोठे आणि कधीतरी', शंकर विनायक ठकार आणि पार्वतीबाई ठकार – 'जागतो संयमी तिथे', शंकर रामचंद्र भिसे यांचे 'जंगलातील छाया', भामरागडचे निसर्ग सौंदर्य आणि आदिवासींचे कंगाल जीवन रेखाटणारे अनिल थत्ते यांचे 'भामरागडची भ्रमणगाथा', जगदीश गोडबोले यांचे 'मोहीम इंद्रावतीची', नारगोलकर यांचे 'जंगलचे राजे' आणि बोर्डी सारख्या ग्रामीण भागात व कोसबाडसारख्या आदिवासी भागात जाऊन तिथे उपयुक्त ठरतील असे विविध शैक्षणिक उपक्रम राबविणाऱ्या आणि त्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य पणाला लावणाऱ्या अनुताई वाघ यांचे 'कोसबाडच्या टेकडीवरून' इत्यादी आत्मचरित्रपर पुस्तके प्रसिद्ध आहेत. यानंतर त्यात आणखी एक भर पडली ती म्हणजे गोदावरी परुळेकर यांची. त्यांनी 'जेव्हा माणूस जागा होतो या नावाने आत्मचरित्रपर पुस्तक लिहिले आहे.

**लेखनशैलीचे वेगळेपण :**

'जेव्हा माणूस जागा होतो' हे पुस्तक निराळे आहे. त्याची लेखनशैली निराळी आहे. 'अनुभवकथनपर', 'आत्मचरित्रपर' या प्रकारातील लेखन असून त्यातून 'ठाणे जिल्ह्यातील आदिवासी वारली शेतकऱ्यांच्या लढ्याचा इतिहास' चित्रित होतो. तसेच या लेखनाचे एकप्रकारचे 'समाजशास्त्रीय लेखन' असे स्वरूप सांगता येईल. आदिवासी वारली शेतकऱ्यांवरील अन्यायाची माहिती देताना गोदावरी परुळेकर यांनी यात वास्तवाला अधिक महत्त्व दिलेले आहे. त्यासाठी त्यांनी विविध शासकीय अहवालांची आकडेवारी व बातम्यांचे संदर्भ यात जागोजागी नोंदवलेले आहेत.

म्हणून गोदावरी परुळेकर यांच्या 'जेव्हा माणूस जागा होतो' या आत्मचरित्रपर पुस्तकाला एखाद्या 'समाजशास्त्रीय ग्रंथाचे', अथवा 'सामाजिक कार्याच्या दस्तऐवजाचे' स्वरूप प्राप्त झालेले दिसते. गोदावरी पुरुळेकर यांच्या कार्याबद्दल त्याकाळी लोकांमध्ये अनेक पूर्वग्रह होते. त्यासाठी त्यांनी आपल्या लेखनावर अतीशोक्तीचा आरोप होऊ नये म्हणून प्रत्यक्षदर्शी ऐतिहासिक दस्तऐवजांचा उपयोग तळ टिपांमध्ये केलेला आहे. हे सदर पुस्तक वाचत असताना पदोपदी जाणवते. मराठीतील स्त्रियांनी लिहिलेली बरीच आत्मचरित्रे ही 'कुटुंब' 'सहजीवन' किंवा आपल्या पतीचे 'पतीचरित्र' व 'आपल्या स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीचे चित्रण' या मुख्य विषयाभोवतीच लिहिलेली आहेत. परंतु गोदावरी परुळेकर यांचे 'जेव्हा माणूस जागा होतो' हे आत्मचरित्र किंवा आत्मपर लेखन केवळ त्याला अपवाद आहे. गोदावरी परुळेकर यांनी कौटुंबिक किंवा खाजगी गोष्टींना यात मांडले नाही. म्हणून या लेखनाला निखळ आत्मचरित्राचे स्वरूप प्राप्त होत नाही. केवळ त्यांनी आदिवासींसाठी केलेल्या कार्याची खडतर वाटचाल यात सांगितली आहे. आदिवासी वारली आणि त्यासाठी त्यांनी केलेले कार्य या विषयीचे अनुभव यात मांडलेले आहेत. 'गोदावरी परुळेकर या आदिवासीएतर लेखिकेने आदिवासी वारली जमातीविषयी लिहिलेले हे पुस्तक आहे' असे त्याचे थोडक्यात वर्णन करता येईल. म्हणून या पुस्तकाचे स्वरूप निराळे आहे. 'अनुभवकथन', 'आत्मपर लेखन' असे या लेखनाचे स्वरूप आहे. या पुस्तकाविषयी आदिवासी साहित्याचे अभ्यासक विनायक तुमराम पुढील अभिप्राय देतात तो महत्वाचा वाटतो; "खरे तर या पुस्तकाला 'अनुभव कथन' किंवा 'संघर्षकथा' किंवा 'निवेदन' म्हणणे अधिक योग्य आहे. स्वतः परुळेकरांनी आपल्या प्रस्तावनेत 'निवेदन' असा शब्दप्रयोग केलेला आहे. तरीही वारली संघर्षाचे चित्रण करणारे एक 'स्वकथन' म्हणून त्याकडे पाहिले पाहिजे. जमीनदार - सेठसावकार आणि वारली यांच्यातील खूपत असलेल्या भावनिक ताणतणावांचे आणि वेठबिगारीविरुद्ध वारल्यांच्या असंतोषाचे दर्शन गोदावरी परुळेकर यांनी या 'स्वकथनात' घडवले आहे. जे पाहिले, पचवले आणि आचरले, तेच त्यांच्या लेखणीतून अवतरले आहे. सोबतच सरकारी दडपशाहीने आदिवासींना कसे सतावून सोडले याचेही 'ऑडिट' करून परुळेकरांनी त्यांची नोंद या स्वकथनाच्या पानोपाणी करून ठेवली आहे."**१**. आदिवासी वारली शेतकरी शेतमजुरांना संघटित करून, त्यांच्यात आत्मभान जागृत करून 'कम्युनिस्ट पार्टी' आणि गोदावरी परुळेकर यांनी जो लढा उभा केला त्याचा इतिहास या पुस्तकात वाचायला मिळतो.

वेगवेगळया बारा प्रकरणांमधून गोदावरी परुळेकर यांनी 'जेव्हा माणूस जागा होतो' या पुस्तकाचे लेखन करत असताना भाग केले आहेत. त्यांना 'पार्श्वभूमी', 'कडेकपारीतील वारल्यांचे जीवन', 'जमीनदार सावकारांचे वैभव', 'वारल्यांवरील अत्याचार व त्यांची यंत्रणा', 'आमची निवासस्थाने', 'वेठबिगारी गाडून टाकली', 'लाल

बावट्याची हाक', 'वाहिली ती गंगा, राहिली ते तीर्थ' व 'दुनयेचा दरवाजा उघडला' अशी या प्रकरणांना शीर्षके दिलेली आहेत. या सर्व प्रकरणांमधून आदिवासी वारली शेतकऱ्यांसाठी जीवाचे रान करून अहोरात्र काम करणाऱ्या गोदावरी परुळेकर यांची व्यक्तिरेखा ठाशिव स्वरूपात चित्रित झालेली दिसते.

**अभावग्रस्त व शोषित वारली जीवन :**

कडेकपाऱ्यात व जंगलात राहणाऱ्या आदिवासी वारली शेतकऱ्यांचे जगणेही मांडलेले आहे. गोदावरी परुळेकर या आदिवासी लेखिका नाहीत. त्या एक मध्यमवर्गीय कुटुंबातील आहेत. साम्यवादी कार्यकर्ते कॉम्रेड शामराव परुळेकर यांच्या त्या पत्नी आहेत. आपल्या पतीसोबत प्रांतिक सभेच्या कामानिमित्त ठाणे जिल्ह्यातील आदिवासी वस्त्यावर फिरत असताना त्यांना वारली आदिवासी शेतकऱ्यांचे भुकेकंगाल, दयनीय, शोषित जीवन पाहण्यात आले. त्यातून वेगवेगळ्या पद्धतीने त्यांचे होणारे शोषण थांबवले पाहिजे ही जाणीव त्यांना झाली. त्यासाठी त्यांनी सावकार, जमीनदार यांच्याविरुद्ध आदिवासी वारली शेतकऱ्यांना जागृत केले. त्यांचे पती कॉम्रेड परुळेकर यांच्या प्रेरणेतून त्यांनी हे कार्य केले. त्यांच्या कार्याविषयी उज्ज्वला गोखले यांचा पुढील अभिप्राय महत्त्वाचा वाटतो. "गोदावरी परुळेकर या मध्यमवर्गीय - सुखवस्तू गृहिणीने स्वतःला पतीच्या कार्यात अंतर्बाह्य झोकून दिले आणि त्यांचा स्वतःकडे, समाजाकडे बघण्याचा दृष्टिकोन संपूर्णपणे पालटला. आदिवासींचे जीवन चरित्र हेच गोदावरीबाईंचे आत्मचरित्र झाले. वैयक्तिक सुखदुःखांना त्यात स्थानच उरले नाही. अशक्त रोगट मुले, अपुऱ्या वस्त्रानेच कसेबसे लज्जारक्षण करणाऱ्या स्त्रिया आणि स्वत्व हरवलेले लाचार आदिवासी पुरुष हे सारे पाहून या स्त्रीचे हृदय कळवळले. स्त्रीचा नैसर्गिक कनवाळूपणा व कार्यकर्त्यांची सेवावृत्ती ही दोन्हीही येथे एकवटली आणि झपाटल्यासारखी ती कार्य करीत राहिली."**२.** आपले सुखासीन जीवन सोडून त्यांच्यासाठी जगावेगळे त्यांनी कार्य उभारले. ठाणे जिल्ह्यातील तलासरी, डहाणू, पालघर व उंबरगाव या भागातील भुकेकंगाल व परस्वाधीन जीवन जगणाऱ्या आदिवासी वारली शेतकऱ्यांना संघटित करून त्यांच्यात स्वाभिमानाची ज्योत प्रज्वलित करतात. त्यांना जागृत करतात. अन्याय करणाऱ्या, शोषण करणाऱ्या जमीनदार, सावकार यांच्याविरुद्ध वारल्यांमध्ये संघर्ष करण्याची शक्ती निर्माण करतात. त्याचा इत्यंभूत वृत्तांत 'जेव्हा माणूस जागा होतो' यात वाचायला मिळतो.

'जेव्हा माणूस जागा होतो' हे पुस्तक आदिवासी वारली जीवनाचा दस्तऐवज आहे. त्यांच्या जगण्याच्या स्थितीगतीचा धांडोळा परुळेकरांनी यातून रेखाटला आहे. वारली शेतकऱ्यांमध्ये अज्ञान, दारिद्र्य प्रचंड प्रमाणात होते. त्याचा गैर फायदा घेऊन तेथील सावकार, जमीनदार, जंगलमक्तेदार व सरकारी अधिकारी या सर्वांनी वारली

शेतकऱ्यांचे पिढ्यानपिढ्या शोषण केले. त्यांच्यावर अमानवी अत्याचार केले. त्यांच्याकडून कमी मजुरीत अधिक श्रम करून घेतले. शेतीच्या कामाकरिता वारली लोकांना अन्न - पाणी न देता जनावराप्रमाणे राबवून घेतले जाई. एक माणूस दुसऱ्या माणसावर एवढा कसा काय अमानुष अत्याचार करू शकतो? एवढा सुसंस्कृतपण देखील या जमीनदार, सावकारांकडे असलेला दिसत नाही. दडपशाही, शोषण, शारीरिक अत्याचार यामुळे त्यांच्यातील माणूस मृतप्राय झाला होता. त्यात अधिक भर म्हणजे त्यांचे भयंकर दारिद्र्य आणि उपासमार असे अक्राळ विक्राळ वारल्यांचे जीवन 'जेव्हा माणूस जागा होतो' चित्रित होते. अशा माणूसकीला पारख्या झालेल्या वारली समुदायातील लोकांना गोदावरी परुळेकर यांनी संघटित केले. त्यांच्यात अन्यायाविरुद्ध लढण्याचे स्फूल्लिंग चेतवले. त्यासाठी त्यांनी स्वतःला झोकून दिले. आदिवासी वारली शेतकऱ्यांच्या जमीनदार सावकारांनी हडप केलेल्या जमिनी त्यांना परत मिळवून दिल्या. तसेच वारली शेतकऱ्यांना संघटित करणे, त्यांना कायदेशीर मदत करून न्यायालयात त्यांचे प्रश्न मांडणे, मजुरीचे योग्य दर मिळवून देणे, 'भूदासपद्धती – लग्नगडी – वेठबिगारी' अशा अमानुष व जाचक शिक्षामधून त्यांची सोडवणूक करणे अशा स्वरूपाचे रचनात्मक व विधायक कार्य गोदावरी परुळेकर यांनी त्यांच्यासाठी केले. त्या दृष्टीने 'जेव्हा माणूस जागा होतो' हे आत्मचरित्र गोदावरी परुळेकर यांनी वारली आदिवासीसाठी केलेल्या सामाजिक कार्याचा दस्तऐवज ठरतो.

गोदावरी परुळेकर यांना कम्युनिस्ट पार्टीच्या माध्यमातून काम करत असताना कडेकपाऱ्यात राहणाऱ्या वारल्यांचे जगणे जवळून पाहता आले. जंगलातील झाडपाला, कंदमुळे, कच्चे आंबे, मोहाची फुले, अळूचे कांदे, अंबाडी, चिंचेचा पाला असे जे जे मिळेल त्यावर हे आदिवासी वारली गुजरान करताना दिसले. अशा अभावग्रस्त स्थितीत जीवन कंठणाऱ्या वारली समुदायाचे जगणे भयावह होते. या पुस्तकात गोदावरी परुळेकर यांनी प्रत्यक्ष पाहिलेला एक प्रसंग पुढीप्रमाणे नोंदवला आहे; "निमुळत्या खोलीतून आतल्या खोलीत पाऊल टाकताच, तेथील दृश्य पाहताच माझ्या छातीत चर्रर झाले. घरची मालकीण व तिच्या भोवती मोठ्या पोटाची तिची नागडी उघडी मुले बसली होती. तिच्या जवळच असलेल्या मडक्यात साधारण मूठभर जाडे तांदूळ, दोन-चार कांद्याच्या ओबडधोबड चिरून टाकलेल्या फोडी, थोडेफार मीठ व मडकाभर पाणी असे तांदूळ शिजेपर्यंत उकडलेले मिश्रण होते. ती बाई करवंटीच्या पळीने ते मिश्रण पोरांना तवलीत वाढत होती. एक तवली संपली की पुन्हा भरायची. मुले ते पाणी ओरपून ओरपून पीत होती. भाताची शिते व कांद्याच्या फोडी चाटून पुसून खात होती. याच मिश्रणात शक्य असेल तेव्हा सुकी मासळी घालून शिजवत असत. पाणी ओरपून ओरपून पोट भरल्यावर, तवल्या टाकून ती मुले मरगळून तेथेच पडली."**३**. गोदावरी परुळेकर यांनी दयनीय स्थितीत जीवन जगणाऱ्या वारली स्त्रियांचे

चित्रण ‘जेव्हा माणूस जागा होतो’ मध्ये केले आहे. आदिवासी वारली स्त्रिया शोषित- पिडीत आहेत. ‘आदिवासी’ आणि त्यात पुन्हा ‘स्त्री’ म्हणून असे या स्त्रियांचे दुहेरी शोषण झालेले आहे. त्यांचे शोषण सावकार, जमीनदारांनी केलेले आहे. त्यामुळे असाह्यता, हतबलता व केविलवाणेपणा हे वारली स्त्रियांच्या जगण्याचे अविभाज्य अंग आहे. या स्त्रियांचे लैंगिक शोषण झालेले आहे. सावकार जमीनदार या वर्गाने आपली लैंगिक भूक भागवण्यासाठी या स्त्रियांचा वापर केलेला आहे. वारली स्त्रियांना सावकार, जमीनदार पशुप्रमाणे वागणूक देत असत. वारली शेतकरी लग्नासाठी सावकारांकडून कर्जाऊ रक्कम  घेत असत. ती रक्कम फिटेपर्यंत जमीनदार या स्त्रियांचा मन मानेल तसा उपभोग घेत. या स्त्रीयांच्या नवर्याला लग्नगडी या कुप्रथेच्या नावाखाली वर्षानुवर्षे राबवून घेत. या स्त्रियांनाही पशूप्रमाणे वागणूक देत. वारली स्त्रियांचे हे बहुपदी दुःख एक स्त्री म्हणून गोदावरी परुळेकर यांनी जवळून पाहिले. ते समजून घेऊन त्याच्याशी त्या समरूप होऊन या पुस्तकांमध्ये त्यांनी रेखाटलेले आहे. याविषयी त्या लिहितात; ‘‘जमीन मालक त्यांच्या कुळाच्या किंवा लग्नगड्यांच्या बायका म्हणजे स्वतःची मालमत्ता समजत. मन मानेल तेव्हा त्यांचा उपभोग घेण्याचा जमीन मालकांचा परंपरागत हक्कच आहे, अशी त्यांची दृढ समजूत होती. कामाला आलेल्या बायकांची अचकट - विचकट थट्टा करणे, त्यांना धक्के मारणे, त्यांच्या अंगाला वेळी-अवेळी स्पर्श करणे, चिमटे घेणे, एकीकडे गाठून अतिप्रसंग करणे या त्यांच्या नित्याच्या घटना होत्या.’’४. या स्त्रियांना शिव्या देणे, मारहाण करणे, त्यांचे लैंगिक शोषण करणे या गोष्टी किरकोळ समजून जमीनदार, सावकार राजरोजपणे त्यांच्यावर अत्याचार करत असत. अशा शोषित, पिडीत तथा दुःख-दारिद्र्याने गांजलेल्या वारली आदिवासी स्त्रियांच्या दुःखाची दयनीय स्थिती गोदावरी परुळेकर यांनी ‘जेव्हा माणूस जागा होतो’ मध्ये वास्तवरित्या रेखाटलेली आहे. एक स्त्रीच दुसऱ्या स्त्रीचे दुःख  समजू शकते हे गोदावरी परुळेकर यांच्या रूपात दिसते.

**निरीक्षणे :**

‘जेव्हा माणूस जागा होतो’ हे एका आदिवासीएतर लेखिकेने लिहिलेले आदिवासींविषयीचे पुस्तक आहे. ठाणे जिल्ह्यात आदिवासी वारली लोकांसाठी गोदावरी परुळेकर यांनी काम केले. ते करत असताना त्यांना आलेले अनुभव यात मांडले आहेत. त्यामुळे या लेखनाचे स्वरूप ‘अनुभवकथनपर’, ‘आत्मचरित्रपर’ असे आहे. तसेच ‘जेव्हा माणूस जागा होतो’ या पुस्तकाला एखाद्या समाजशास्त्रीय ग्रंथाचेही स्वरूप प्राप्त होते. आपले वैयक्तिक जगणे, कौटुंबिक पार्श्वभूमी, गोदावरी परुळेकर यांनी यात मांडली नाही. केवळ त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याचे दर्शन घडवले आहे. म्हणून या पुस्तकाचे सामाजिक ‘कार्याचा दस्तऐवज’ असेही एक

वेगळेपण नोंदवता येते. दडपशाही, शोषण, शारीरिक अत्याचार, दारिद्र्य आणि उपासमार या सर्वांमधून भरडून निघालेला आदिवासी वारली आणि त्याचे जगणे या पुस्तकातून अधोरेखित होते. अशा माणुसकीला पारख्या झालेल्या वारली समुदायाला गोदावरी परुळेकर यांनी संघटीत केले. त्यांच्यात माणुसकीची ज्योत प्रज्वलित केली. सावकार, जमीनदार यांच्याविरुद्ध लढण्यासाठी त्यांना संघटित करून मोठा लढा उभा केला त्या लढ्याचा इतिहास या पुस्तकाच्या पानापानातून नजरेस भरतो.

**संदर्भ :**


**१.** तुमराम विनायक, 'आदिवासी साहित्य : दिशा आणि दर्शन', स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, १९९४, पृ. १७८.

**२.** गोखले उज्ज्वला, 'स्त्रियांची आत्मचरित्रे : स्वरूप आणि चिकित्सक विवेचन', संस्कृती प्रकाशन पुणे २०२३, पृ. २९९.

**३.** परुळेकर गोदावरी, 'जेव्हा माणूस जागा होतो', मौज प्रकाशन गृह मुंबई, १० वी आवृत्ती २०१२, पृ. २६.

**४.** तत्रैव., पृ. ४१.